## दरखास्त निशाणी क्रमांक ०१ खालील आदेश

**( पारीत केलेला दिनांक ०९.०२.२०२४)**

**०१.** अभिलेखाचे अवलोकन केले.

**०२.** अभिलेखावरुन असे दिसते की, दिनांक २०.०६.२०२३ रोजी धनकोने ऋणकोंना नोंदणीकृत टपालाने नोटीस काढण्यासाठी अर्ज **नि.क्र.१५** केला आहे. ऋणको क्रमांक ०२ दिनांक २६.०७.२०२३ रोजी अर्ज **नि.क्र.१६**, वकीलपत्र **नि.क्र.१७** आणि पत्ता मेमो **नि.क्र.१८** अनुसार विधीज्ज्ञ श्री. डी. एच. सराफ यांचे मार्फत हजर झाला आहे. तथापि, **नि.क्र.१६ ते १८** यांना नजरचुकीने रोजनाम्यात घेण्यात आलेले नाही.

**०३.** धनकोने दिनांक ०५.०८.२०२३ रोजी ऋणकोंविरुध्द स्थानिक वृत्तपत्रात नोटीस काढण्यासाठी अर्ज केला असून त्याला नजरचुकीने **नि.क्र.१५** आणि सोबतच्या शपथपत्राला **नि.क्र.१६** देण्यात आले आहे. ऋणको क्रमांक ०२ चा अर्ज **नि.क्र.१६**, वकीलपत्र **नि.क्र.१७** आणि पत्ता मेमो **नि.क्र.१८** हे कागदपत्र रोजनाम्यात न घेण्यात आल्यामुळे पुढील निशाणी क्रमांक चुकले आहेत. तसेच **नि.क्र.२१** दुबार झाला आहे. म्हणून चुकलेल्या दिनांक ०५.०८.२०२३ पासून पुढे देण्यात आलेल्या **नि.क्र.१५ ते २३** यांना दुरुस्त करणे आवश्यक आहे. म्हणून **नि.क्र.१५ ते २३** यांना **नि.क्र.१९ ते २८** असे दुरुस्त करणे आवश्यक आहे. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

### आदेश

०१. **नि.क्र.१५ ते २३** यांना **नि.क्र.१९ ते २८** देण्यात येते.

Digitally signed by Subhash Laxman Phule
Date: 2024.02.09 17:59:14 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**

**दिनांक :– ०९.०२.२०२४.** **सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण :– औसा.** **जिल्हा लातूर.**